





दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २८ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# पावनधाम येथे पंकजा मुंडे यांच्या दौऱ्यात मराठा बांधवांनी दाखवले काळे झेंडे !

## एक मराठा लाख मराठा दिल्या घोषणा अंदोलकावर सौम्य लाठीचार्ज

## युसुफ वडगाव पोलीसांनी मराठा आंदोलकांना सकाळीच केले नजर कैद



**वादळवार्ता/केज**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज तालुक्याच्या दौऱ्यावर असलेल्या भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांची गाडी पावनधाम येथे मराठा आंदोलकांनी अडवली.यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला.पोलीस संरक्षणात मुंडे यांची गाडी बाहेर काढून देण्यात आली. बीड लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार म्हणून पंकजा मुंडे या गेल्या आठवडाभरापासून प्रचाराला लागल्या आहेत. आज केज तालुक्यातील दौऱ्यावर असताना पावनधाम येथील अखंड हरिनाम सप्ताहाला उपस्थित राहण्यासाठी पंकजा मुंडे गेल्या होत्या. पंकजा मुंडे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर केज पोलिसांनी काही आंदोलकांना नोटीस दिल्या होत्या. यापूर्वी साक्षाळपिंप्री येथे मुंडे यांच्या गाडीसमोर काही आंदोलकांनी काळे झेंडे दाखवले होते,त्यामुळे पोलिसांनी खबरदारी म्हणून युसुफ वडगाव सर्कल मधील काही मराठा आंदोलकांना नोटीस दिल्या होत्या यानंतर बुधवारी पंकजा मुंडे यांच्या गाडीसमोर काही कार्यकर्ते जमा झाले,रस्त्यावर गाडी अडवत या आंदोलकांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत आंदोलन केले.यावेळी आंदोलक ऐकत नाहीत हे लक्षात आल्यावर पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण



निर्माण झाले होते. महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे हे केज दौऱ्यावर आसताना पावनधाम येथील अखंड हरिनाम सप्ताहाला उपस्थित राहणार होत्या, त्यामुळे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, परंतु पंकजा मुंडे ह्या पावनधाम या ठिकाणी येण्याअगोदरच मराठा आंदोलकांना पोलिसांनी अटक केले ,व पोलिसांनी लाठीचार्ज केला मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यासाठी कुणी आदेश दिले याची चौकशी व्हावी आशी चर्चा नागरीक करत आहेत

## वाळसुरे गावात शिमगा उत्सवाचे आयोजन

**वादळवार्ता/रायगड**

संपूर्ण भारताचे अखंड दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली पुण्य भूमी व रायगड किल्ल्याचा टेहळी अशी ओळख व इतिहासात आपल्या धाडसाने अजरामर झालेली हिरकणी मातेचे वास्तव्य लाभलेले वाळसुरे गाव तालुका महाड जिल्हा रायगड , येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही शिमगा उत्सवाचे आयोजन मोठ्या उत्साहात पारंपरिक पद्धतीने करण्यात येणार आहे त्या निमित्ताने सोमजाई मंदिर येथे वाळसुरे, दत्तवाडी, नगरभुवन होळी सणा निमित्त मीटिंग घेण्यात आली, .दिनांक 24 रात्री 11.30 वाजता होळी (होम) लावण्यास सुरुवात होईल, दिनांक २८



रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन, तसेच शुक्रवार सानेवर श्री सत्यनारायण महापूजा सकाळीं 9.00 ते 12.00 व दुपारी 12.30 ते 2.30 महाप्रसाद,दिनांक 30 रोजी सकाळी 7.00 (देवी) पालखी सानेवरून सोमजाई मंदिरात जाईल .सकाळी 8.00 ते 12.00 दत्तवाडी पालखी मिरवणूक दुपारी 12.00 ते 1,00 दत्तवाडी ते नगरभुवन पालखी जाणार दुपारी 1.00 ते 3.00 नगर भुवन पालखी मिरवणूक दुपारी 3.00 ते 4.00 नगर भवन ते वाळसुरे गाव पालखी येणार दुपारी 4.00 ते रात्री 10.00 वाळसुरे मिरवणूक , व इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, तरी सर्वांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन ग्रामस्थ वाळसुरे, दत्तवाडी, नगरभुवन तर्फे करण्यात आले आहे.

## मराठा आरक्षणासाठी विद्यार्थ्याची आत्महत्या

**वादळवार्ता/बीड**

:मराठा आरक्षणासाठी आतापर्यंत अनेकांनी आत्महत्या केल्या. बुधवारी (दि.29) सकाळी एका 17 वर्षीय महाविद्यालयीन तरुणाने सग्यासोयऱ्याच्या अंमलबजावणीसाठी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना वरवटी येथे घडली. सदरील विद्यार्थ्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालय या ठिकाणी आणण्यात आला होता. पोलीसांच्या माहितीनुसार, सोहम कल्याण शिंदे (वय 17) असे मयताचे नाव आहे.



नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार कुणबीची नोंद सापडत नसल्याने सोहम याने बुधवारी सकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली. हा तरुण शहरातील बलभीम महाविद्यालयामध्ये अकरावी वर्गात शिक्षण घेत होता. या घटनेची माहिती ग्रामस्थांना कळल्यानंतर अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली होती. शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयामध्ये आणण्यात आला होता. या प्रकरणी बीड ग्रामीण ठाण्यात नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होती.

## पाटोदयात शहीद दिन वैचारिक पद्धतीने साजरा शहिदांना दिली मानवंदना

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा शहरात 'शहीद दिन' वैचारिक मशाली पेटवून व परिसरातील हुतात्म्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमात मंथन केले . २३ मार्च शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येत असतो मात्र यंदा डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येत शहिद दिन वैचारिक पद्धतीने साजरा करण्याचे ठरविले होते. त्या अनुषंगाने पाटोदा शहराच्या विद्युत मंडळाच्या कामगार भवनात कार्यक्रम पार पडला या वेळी डाव्याविचाराचे वरिष्ठ नेते कॉ. महादेव नागरगोजे अध्यक्ष स्थानी होते तर प्रमुख वक्ते कॉ.ज्योतिराम हरकुडे हे होते.त्यांनी शहीदांच्या जीवनावर प्रकाश टाकले त्यावेळी उपस्थितीतांच्या अंगावर शहारे येण्यासारखे अनेक प्रसंग त्यांनी ज्वलंतपणे मांडले. यावेळी प्रामुख्याने जेल मधील प्रसंगाचा उल्लेख केला. जेलर भगतसिंगला फासीसाठी बोलवायला गेले असता शहिद भगतसिंग म्हणाले, ठैरों एक क्रांतिकारक दूसरे क्रांतिकारक से बात कर रहा है..यावेळी कॉ.महादेव नागरगोजे, शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस भाई विष्णुपंत घोलप,कॉ.एम.डी.नागरगोजे, कॉ.भगवान जावळे,आदींनी आपले मनोगत व्यक्त करतांना भारत देशासाठी बलिदान देणाऱ्यांची भावना काय होती. व सध्याची परिस्थिती काय आहे. यावर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. बलराज अविळे यांनी केले . या प्रसंगी शहिद अजित वाल्हेकर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुजित वाल्हेकर, शहिद तौसिफ शेख यांचे वडील अरीफ भाई,जेष्ठ पत्रकार छगन मुळे,पत्रकार जावेद शेख, राजेंद्र जायभाय,सागर तुपे, कॉम्रेड इलियास भाई,डि.एन.सोनवणे,मेजर शहादेव पवार,आदी मान्यवर उपस्थित होते..

## लोकसभा निवडणूक

### मला दिल्लीत पक्षश्रेष्ठींनी ताटकळत ठेवल नाही उदयनराजे भोसले



खासदार उदयनराजे भोसले आज दिल्लीतून साताऱ्यात परतले आहेत. उदयनराजे दिल्लीतून पक्षश्रेष्ठींकडून आपल्या लोकसभा उमेदवारीचं तिकीट पक्क करुनच परतले आहेत. सातारा लोकसभेचं तिकीट आपल्यालाच मिळेल, अशी उदयनराजे यांना खात्री आहे. त्यामुळे त्यांच्या समर्थकांकडून आज उदयनराजेंचं साताऱ्यात जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी उदयनराजेंना अमित शाह यांच्या भेटीसाठी तीन दिवस ताटकळत का राहावं लागलं? या प्रश्नाचं उत्तर उदयनराजे यांनी स्वत: दिलं.

### भाजपकडून उमेदवारी मिळताच नवनीत राणा यांचा सर्वात मोठा निर्णय



खासदार नवनीत राणा यांना भाजपकडून अमरावती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यानंतर आता नवनीत राणा या आपल्या युवा स्वाभिमान पक्षाच्या महिला कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा देणार आहेत. खासदार नवनीत राणा या युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्याकडे आपला राजीनामा सोपवणार आहेत. त्यांच्या राजीनामाची प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती समोर येत आहे. तसेच नवनीत राणा यांना आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष लोकसभा निवडणुकीत पाठिंबा देणार आहेत. विशेष म्हणजे भाजपची उमेदवारी घोषित होताच नवनीत राणा नागपूरसाठी रवाना झाल्या आहेत.

### पंतप्रधान मोदी आणि माझ्यात कोणताही वाद नाही, नितीन गडकरी



प्रकाश आंबेडकर यांनी नितीन गडकरी यांच्याबाबत एक वक्तव्य केलं होतं. भाजप पक्ष 200 पेक्षा कमी जागांवर विजय झाला तर नितीन गडकरी हे पंतप्रधान असतील, असं वक्तव्य आंबेडकरांनी व्यक्त केलं होतं. त्यांच्या या वक्तव्याबाबत नितीन गडकरी यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भूमिका मांडली. "आम्हाला या निवडणुकीत बहुमत मिळणार आहे. मोदीजीच देशाचे पंतप्रधान होणार आहेत. त्यामुळे दुसरे कोणाच्या होण्याचा विषय होत नाही. माझ्या डोक्यातही तसा विषय नाही. आम्हाला 400 पार जागा मिळतील आणि मोदीजी देशाचे पंतप्रधान होतील", असं नितीन गडकरी म्हणाले.

## शिवछत्रपती पारंपारिक शिवजन्मोत्सव शोभा यात्रेत शिवप्रेमींनी उपस्थित रहावे-अध्यक्ष संतोष काळे

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई शहरात राजा शिवछत्रपती पारंपरिक शिवजयंती उत्सव मोठया उत्साहात साजरी होणार असून या ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळ्यास शहर व परिसरातील शिवप्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष काळे यांनी केले आहे.

अंबाजोगाई शहरात मागील ६० वर्षापासून राजा शिवछत्रपती पारंपारिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शिवजन्मोत्सव निमित्त भव्य दिव्य अशी ऐतिहासिक शोभायात्रा काढली जाते. घोडे,हत्ती, उंट, वारकरी, वासुदेव हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण असते तर या शोभायात्रेत दांडपट्टा, तलवारबाजी यांसारखे ऐतिहासिक शिवकालीन खेळ राजा शिवछत्रपती पारंपरिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शोभायात्रेत दाखवले जातात. शिवजयंती उत्सवानिमित्त दि.२८ मार्च गुरुवार रोजी सायं.६ वा. भव्य दिव्य शोभा निघणार आहे. या शिवजन्मोत्सव शोभा यात्रा उद्घघाटन बीड जि.प.चे माजी अध्यक्ष विजयसिंह (राजे) पंडित यांच्या हस्ते होणार आहे.तर अध्यक्षस्थानी नंदकिशोर मुंदडा राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून अंबासाखर चे चेअरमन रमेशराव आडसकर, मा.नगराध्यक्ष राजकिशोर मोदी,मा.आ.पृथ्वीराज साठे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, दीनदयाळ बँक अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की,मा. उपनगराध्यक्ष बबन लोमटे,सारंग पुजारी,युवा नेते ऋषिकेश आडसकर, दीपक शिंदे,शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष रणजीत लोमटे,माजी नगरसेवक अनंत लोमटे, सुरेश कराड,दिलीप काळे, कमलाकर कोपले, संजय गंभीरे, प्रशांत आदनाक, बाळासाहेब सोनवणे, शिवसेना तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे, रोटरी अध्यक्ष स्वप्निल परदेशी आदी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अंबाजोगाई शहरात निघणाऱ्या ऐतिहासिक शोभायात्रेस अंबाजोगाई तालुक्यातील शिवप्रेमीनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष काळे यांनी केले आहे.



## संपादकीय

# भारतीय लोकसंख्या परिस्थिती सुधारणा हेतू!

भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडेन्स लीगची स्थापना केली. इंडियन इंडिपेंडन्स लीगला आयआयएल म्हणूनही ओळखली जाते. ही एक राजकीय संघटना होती जी १९२० ते १९४०च्या दशकात ब्रिटिश भारताबाहेर राहणाऱ्यांना या प्रदेशावरील ब्रिटिश वसाहतवादी शासन हटवण्याच्या प्रयत्नात संघटित करण्यासाठी चालवली गेली. भारतीय राष्ट्रवादींनी स्थापन केलेले, त्याचे उपक्रम आग्नेय आशियातील विविध भागांमध्ये आयोजित केले गेले. त्यात भारतीय प्रवासी आणि नंतर, दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या भागात जपानच्या यशस्वी मलायन मोहिमेनंतर जपानी ताब्यांतर्गत निर्वासित भारतीय राष्ट्रवादीचा समावेश होता. मलायावरील जपानी ताब्यादरम्यान, जपानी लोकांनी मलायामधील भारतीयांना लीगमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले.

भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. प्रामुख्याने भारतीय राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जपानी पाठिंबा मिळवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली लीग विसर्जित होण्यापूर्वी मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या भारतीय राष्ट्रीय लष्कराशी संवाद साधण्यासाठी आणि कमांड देण्यासाठी स्थापन करण्यात आली. रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आईएनए सुपूर्द केली. नंतर दक्षिण पूर्व आशियामध्ये सुभाषचंद्र बोसचे आगमन आणि आईएनएचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर आझाद हिंदला मार्ग देण्याआधी लीग त्यांच्या नेतृत्वाखाली आली. दक्षिण-पूर्व आशिया व्यापल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर प्रवासी भारतीय लोकसंख्या जपानच्या ताब्यात आली होती. युद्ध मलायापर्यंत पोहोचण्यापूर्वीच स्थानिक भारतीय संघटनांची चौकट अस्तित्वात होती. यापैकी सर्वात मोठे म्हणजे युद्धपूर्व सेंट्रल इंडियन असोसिएशन, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीग आणि इतर संघटनांचा समावेश होता आणि त्यांच्या सदस्यांमध्ये प्रख्यात भारतीय प्रवासी होते, उदा. केपीके मेनन, नेद्यम राघवन, प्रीतम सिंग, एससी गोहो आणि इतर. व्यवसाय प्राधिकरणाच्या प्रोत्साहनाने, या गटांनी स्थानिक भारतीय स्वातंत्र्य लीगमध्ये एकत्र येण्यास सुरवात केली आणि स्थानिक भारतीय लोकसंख्या आणि जपानी व्यापाऱ्यांमधली प्रमुख संपर्कसंस्था बनली. इंडियन इंडिपेंडन्स लीगमध्ये सामील झाल्यामुळे सुरक्षा आणि फायदे मिळाले. आयआयएल कार्ड दाखवल्याने रेल्वे तिकिटाची खरेदी सुलभ झाली आणि टूथपेस्ट आणि साबण यासारख्या कठीण वस्तूंच्या आयआयएल मुख्यालयात वाजवी किमतीत खरेदी करता आली. हे एक साधन होते ज्याद्वारे रेशन जारी केले जात असे. याशिवाय आयआयएलला स्विस रेडक्रॉससोबत काम करण्याची परवानगी असल्याने सदस्यांना पत्रे मिळू शकत होती आणि सिलोनसारख्या ठिकाणी पोहोचणे कठीण होते. रासबिहारी बोस हे एक भारतीय क्रांतिकारक होते, ज्याने सन १९१२च्या दिल्ली-लाहोरच्या कटाची योजना तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्रच्या हत्येसाठी केली

# शत्रूवरही प्रेम करा!

ज्या दिवशी प्रभू येशू ख्रिस्तांना वधस्तंभावर लटकवण्यात आले तो दिवस शुक्रवारचा होता. त्यामुळे येशू ख्रिस्तांच्या स्मरणार्थ हा दिवस गुड फ्रायडे म्हणून पाळतात. ख्रिश्चन धर्माचे अनुयायी हा दिवस शोक दिवस म्हणूनही पाळतात. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या या संकलित लेखातून वाचा ज्ञानवर्धक माहिती... संपादक.

जगभर साजरा होणारा सण- शुभ शुक्रवार! प्रामुख्याने जे लोक हा सण साजरा करतात, त्यांच्या प्रेषिताला खरेतर आज क्रुसावर चढविले होते. एवढेच काय ज्या रोमन शिपायांनी त्याला क्रुसावर चढविले होते, त्यांच्यापैकी एकाने स्वत: त्याच्या छातीत भाला भोसकून तो नक्की मृत झाला आहे ना, याची खात्रीही केली होती- (पवित्र बायबल: संत योहान- अध्याय: १९ : वचन २४). तरी या दिवसाला जगभरात ख्रिस्ती बांधव शुभ शुक्रवार- गुड फ्रायडे म्हणतात! का बरे?.... कारण हा दिवस इतिहासातील येशू ख्रिस्ताच्या जीवनातील सत्यकथेच्या परमोच्च बिंदूकडे घेऊन जातो. या दिवशी येशू ख्रिस्तापूर्वी होऊन गेलेल्या अनेक संदेष्ट्यांनी वर्तवलेली येशूविषयीची सर्वात महत्त्वाची भविष्यणी पूर्ण झाली होती. कोणतीही चूक, कोणतेही पाप न केलेल्या परमेश्वराच्या पुत्राला माणसांनी सुळावर चढविले. मग हा शुक्रवार शुभ कसा? त्याचे उत्तर बायबलच्या नव करारातील चार शुभवर्तमानात आहे.

येशूंच १२ शिष्यांपैकी फक्त संत मार्क, संत लुक आणि संत योहान यांनी येशूंच्या मृत्यूनंतर व पुनरुत्थानानंतर अनेक वर्षांनी त्यांचे चरित्र लिहून ठेवले आहे. त्यानुसार मृत्यूच्या तिसऱ्या दिवशी जेव्हा त्यांचे शिष्य त्यांच्या मृतदेहाला सुगंधी मसाले लावण्यासाठी त्यांच्या कबरीजवळ गेले, तेव्हा त्यांना तेथे केवळ त्यांची त्यागाची वस्त्रे आढळली. तेव्हा उभ्या असलेल्या एका दिव्य आकृती- देवदूताने त्यांना विचारले, तुम्ही येशूला शोधीत आहात का? तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यात का करता? तो तुमच्या आधीच गालील गावामध्ये त्याने मृत्यूपूर्वी सांगितल्यानुसार गेलेला आहे. (पवित्र बायबल: संत लुक- २४ वा अध्याय: वचन ५ व ६) येशूने मृत्यूला शांतपणे सामोरे जाऊन, मृत्यूवर विजय मिळवून ते पुनरुत्थानित झाले. म्हणून शुक्रवारच्या या दिवसाला शुभ शुक्रवार म्हटले जाते. अनेकांचा येशूच्या या पुनरुत्थावर विश्वास बसत नाही. परंतु येशू ख्रिस्ताने पुनरुत्थानानंतर त्यांच्या १२ शिष्यांसह सुमारे ५०० पेक्षा अधिक लोकांना दर्शन दिले. हिंदू धर्माचे महान प्रसारक योगी परमहंस योगानंद यांनीही या गोष्टीची साक्ष दिली आहे. त्यांच्या "ऑटोबायोग्राफी ऑफ अ योगी" या पुस्तकाला डॉ.डब्लू.वा.इव्हेन्स वेन्टस् यांची प्रस्तावना आहे. स्वामींनी या ग्रंथाच मराठी आवृत्तीतील प्रश्न क्र.६७८ व ६७९ या पृष्ठावर स्वत:ला झालेल्या प्रभू येशूंच दर्शनाचा वृत्तांत दिला आहे. येशू ख्रिस्तांच्या १२ शिष्यांपैकी एक असलेला संत थॉमस याने येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाविषयी संशय घेतल्याचा उल्लेख बायबलमध्ये आढळतो. पुनरुत्थानानंतर प्रभू येशू त्यांच्या शिष्यांना भेटले, त्यावेळी त्या खोलीत थॉमस नव्हता, तर इतर शिष्यांनी त्याला प्रभू येशूंच्या दर्शनाचे वृत्त सांगितले. तेव्हा तो म्हणाला, "मी त्यांना प्रत्यक्ष पाहिले, तरच मी त्यांच्या जिवंत होण्यावर विश्वास ठेवीन." त्यानंतर एकदा थॉमससह सर्व शिष्य एका खोलीत प्रार्थना करीत होते व ती खोली आतून बंद होती. त्यावेळी प्रभू येशू तेथे अचानक प्रकटले. त्यांच्या भोवतीचा प्रकाश व त्यांचे तेज पाहून शिष्य घाबरले. प्रभू त्यांना म्हणाले, "तुम्हास शांती असो" प्रभू येशू ख्रिस्ताने संत थॉमस या शिष्यला जवळ बोलावले आणि आपल्या छातीमध्ये ज्याठिकाणी रोमन शिपायाने भाला भोसकला होता, तेथे त्याचे बोट लावले व विचारले, "आतातरी विश्वास ठेवतोस का?" त्यावर सद्गदीत होऊन थॉमस म्हणाला, "माझा प्रभू, माझा देव." माणसाच्या संशयी प्रवृत्तीला ओळखून येशूने थॉमस या आपल्या शिष्याला म्हटले, "आता तू पाहिले म्हणून विश्वास ठेवला आहेस. परंतु जे न पाहता विश्वास ठेवतात ते धन्य!"

प्रभू येशूंचे मृतामधून पुन्हा उठणे व अनेकांना दर्शन देणे, हे त्यांचे देवत्व व अमरत्व सिद्ध करते. पण त्याही पलीकडे हे सत्य हा शुक्रवार स्पष्ट करतो. ते म्हणजे सत्याचा असत्यावरील विजय, प्रेमाचा द्वेषावरील विजय. कारण क्रुसखांबावर आपल्या अंतिम घटिका मोजत असताना या दिव्य महात्म्याने "हे देवा, यांना क्षमा कर! कारण ते काय करतात त्यांना कळत नाही" (पवित्र बायबल: संत लुक- अध्याय २३: वचन ३४) असे म्हटले होते. आज सुसंस्कृत जगाला दहशतवादाच्या माध्यमातून वेठीस धरले जात आहे, अशावेळी आपल्या मारेकर्यांनाच क्षमा करावी, म्हणून परमेश्वराकडे याचना करणारे प्रभू येशू केवळ आकाशापर्यंतच उंच होत नाही, तर स्वर्गापर्यंत उंच होत आहेत. प्रभू येशूने त्याचे संपूर्ण जीवन मानवाला जीवनाचे खरे ध्येय समजावून सांगण्यात घालविले. ज्या इस्त्राईलात जेरुसलेम येथे येशूचा जन्म झाला तेथील धर्मग्रंथात न्याय आणि शिक्षेबद्दल असे सांगितले होते की, कुणी कोणाचा डोळा फोडला तर त्याचा डोळा फोडण्यात यावा. कुणी कोणाचा हात तोडला असेल तर त्याचा हात तोडण्यात यावा. परंतु येशू ख्रिस्ताने मात्र आपल्या अनुयायास सांगितले, "दुष्टाला अडवू नका, जो तुमच्या उजव्या गालावर मारतो, त्याच्यापुढे दुसरा गाल करा. जो तुमची बंडी हिसकावून घेऊ पाहतो, त्याला तुझा अंगरखाही दे," याप्रमाणे येशू ख्रिस्ताला सूडचक्रातून मानवजातीची सुटका करायची आहे. कारण रागाने राग आणि द्वेषाने द्वेष वाढतो हाच इतिहास आहे. येशूने म्हटले, "तुम्ही शत्रूवर प्रेम करा, शेजाऱ्यावर प्रीती करा!" हा जगावेगळा सल्ला कुणालाही पाळायला कठीणच आहे, परंतु प्रभूने यामागे दिव्य तर्कसंगती सांगितली आहे. तो म्हणतो, "जे तुम्हाला उसने देतात, त्यांना तुम्ही परत मिळेल या भावनेने उसने दिले, तर त्यात काय मोठेपणा? पापी लोक हे पापी लोकांना उसने देतात, तुम्ही पाप पुण्याचा विचार न करता सर्वांवर सारखे प्रेम करणाऱ्या परमेश्वराचे पुत्र आहात ना? मग त्याच्यासारखे व्हा." तो म्हणजे परमेश्वर चांगले व वाईट अशा दोन्ही लोकांच्या शेतावर पाऊस पाडतो व त्यांना विपुल सुख देऊ इच्छितो. जे तुमचा द्वेष करतात त्यांच्यावर प्रेम केले तरच ते दिव्य प्रेम, नाही तर आपल्यावर प्रेम करणाऱ्यांवर प्रेम करणे हा तर व्यवहार झाला.

आज संपूर्ण जगामध्ये दु:खी लोकांचे अश्रू पुसणाऱ्या, आजाऱ्यांची सेवा करणाऱ्या, मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्यांना, युद्धातील जखमींना, भूकेल्यांना अन्न देणाऱ्या, गरिबांची सेवा करणाऱ्या असंख्य संस्था, व्यक्ती जे अफाट प्रयत्न करीत आहेत, त्यामागे उभे आहे त्या दिव्य येशू ख्रिस्ताने संपूर्ण मानवजातीच्या उद्धारासाठी केलेले क्रुसावरचे समर्पण. त्या महान, करुणामयी, प्रेममयी देवपुत्रास शतशः नमन! !!गुडफ्रायडेच्यासर्वईश्वरप्रेमींना हार्दिक प्रेमळ शुभेच्छा !!

**- संकलक व सुलेखक -**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हाट्सअॅप- ९४२३७१४८८३.**
**इमेल- nikodekrishnakumar@gmail.com-**

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात नॅक पूर्वतयारी कार्यशाळा संपन्न

**माजलगाव /प्रतिनिधी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली नॅक पूर्वतयारी कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शक म्हणून खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा नॅक पीयर टीमचे सदस्य डॉ. ना.शे. धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये संपूर्ण दिवसभर त्यांनी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागांना भेटी देऊन विभागाची पाहणी केली व त्यातील वेगवेगळे बारकावे त्यांनी उदाहरणे देऊन समजावून सांगितले. विभागात नॅक कमिटी आल्यानंतर किंवा पी.पी.टी. प्रेझेंटेशन करताना शब्दाचा वापर कसा करावा, कोणते शब्द वापरल्याने समोरच्या व्यक्तीवर चांगला प्रभाव पडू शकतो किंवा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. महाविद्यालयातील वातावरण स्पष्ट आणि बोलके असावे. महाविद्यालयातील भिंती या बोलक्या व संपूर्ण वातावरण हे आकर्षित व अल्हाददायक असे असावे. एकंदरीतच नॅक पीयर टीम महाविद्यालयात दाखल झाल्यानंतर त्यांना या महाविद्यालयाविषयी आस्था वाटावी, खरोखरच हे महाविद्यालय समाजातील लोकांना योग्य असे संस्कार देत आहे अशी धारणा या सदस्यांची झाली पाहिजे त्यासाठी महाविद्यालयातील प्रत्येक घटकाने आपल्यामुळे नॅकचा एकही मार्क कमी होऊ नये याविषयी प्रयत्न करावेत व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सर्वांनी सामूहिक प्रयत्न केल्यास नक्कीच महाविद्यालयास नॅक मूल्यांकनामध्ये चांगला दर्जा मिळू शकतो असा विश्वास त्यांनी या प्रसंगी सर्वांना दिला.या कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी महाविद्यालयातील आज पर्यंत नॅक विषयी केलेल्या तयारीचा आढावा घेतला तसेच एकता, अनुशासन व आत्मविश्वास यांच्या बळावर महाविद्यालयास नक्कीच चांगला दर्जा मिळवू असा आत्मविश्वास त्यांनी प्रसंगी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, आपली संस्था ही राष्ट्रीय विचारसरणी समाजास देणारी संस्था आहे. त्यामुळे या संस्थेतील व महाविद्यालयातील प्राध्यापक हे जे काम करतात ते काम राष्ट्रीय विचारसरणीचे असणार आहे. या महाविद्यालयातून घडणारा प्रत्येक विद्यार्थी हा राष्ट्रीय विचारसरणीचा निर्माण होईल व नॅक समितीला देखील आपल्या महाविद्यालयास चांगला दर्जा देऊन गौरवान्वित करावे लागेल असा आत्मविश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी केले तर आभार आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. विनायक देशमुख यांनी मांडले. या कार्यशाळेत महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होते.

# घाटनांदूर रेल्वेस्थानकावर जलदगती रेल्वे गाड्यांना थांबा मिळेना गावातील तरुणांचा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय ?

**दैनिक वादळ वार्ता अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानकावर जलदगती रेल्वेड्यांना थांबा देण्यात यावा; अशी मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून करण्यात येत आहे. वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही या मागणीला यश येत नसल्याने नागरिकांचा लोकप्रतिनिधींवरचा विश्वास उडाला असून प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. खा. प्रितम मुंडे यांनी रेल्वे प्रश्नासंदर्भात घाटनांदूरकरांची केवळ अश्वासनावरच बोळवण केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे _ येथील तरुणांनी जोपर्यंत जलदगती रेल्वे गाड्यांना थांबा मिळत नाही तोपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे खा. प्रितम मुंडे यांनी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सुनीत शर्मा यांच्याकडे दिल्ली येथे भेट घेऊन याबाबतीत निवेदन सादर केले होते. दीड वर्ष उलटूनही येथील रेल्वेस्थानकावर जलदगतीने धावणाऱ्या रेल्वेगाड्या थांबत नसल्याने; खा. मुंडे यांच्या निवेदनाची रेल्वे बोर्डाने दखल नाही; किंवा त्यांचे प्रयत्न अपुरे पडले आहेत. असेच वाटते कारण आतापर्यंत घाटनांदुर रेल्वे स्थानकावर जलद रेल्वे थांबत नाहीत घाटनांदूर रेल्वेस्थानक हे प्रवासी आणि व्यापारी दृष्ट्या अतिशय सोयीचे व महत्वाचे स्थानक आहे. या मार्गाहून जाणाऱ्या जलदगती गाड्यांना येथे थांबा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जलद रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा मिळाला तर, अंबाजोगाई शहारासह घाटनांदूर परिसरातील तीस ते चाळीस खेडे गावातील प्रवासी नागरीक व व्यापाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. तसेच अंबाजोगाईसह परिसरातील माल खरेदीच्या निमित्ताने हैद्राबाद, बैंगलोर आणि मुंबईला जाणाऱ्या व्यावसायिकांसाठी घाटनांदूर रेल्वेस्थानक हे एक मध्यवर्ती रेल्वेस्थानक आहे. अंबाजोगाई शहर तसेच तालुक्यातील इतर गावांतून जाणाऱ्या घाटनांदूर रेल्वे स्थानक अधिक सोयीचे आहे. घाटनांदूर येथील रेल्वे स्थानकावर जलदगती गाड्यांना थांबा देण्यात यावा; ही मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून येथील नागरिकांकडून आमदार आणि खासदारांकडे केली जात आहे. मात्र लोकप्रतिनिधी वारंवार या क्षुल्लक प्रश्नाकडे दुर्लक्ष करून गावकऱ्यांची थट्टा उडवत आहेत. पूर्वीच्या नांदेड - बँगलोर, औरंगाबाद हैद्राबाद आणि नुकत्याच सुरू झालेल्या नांदेड हुबळी, नांदेड तिरुपती या दोन जलदगती रेल्वेगाड्यांना येथे थांबा नसल्याने तळं उशाला; पण कोरड घशाला अशी प्रवाशांची अवस्था झाली आहे. कोविड-१९ चे कारण देऊन एकमेव नांदेड- बैंगलोर (जलदगती) असलेल्या गाडीचा थांबा सुद्धा एका वर्षातच रद्द करण्यात आला. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. याकडे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी मात्र दुर्लक्ष करत असल्याने प्रवाशी नागरिक हताश झाले आहेत. नांदेड-बंगलोर एकमेव जलदगती गाडी येथे थांबत होती; त्यातून महिन्याकाठी लाखों रुपयांचे उत्पन्न रेल्वे खात्याला मिळत असूनही गाडीचा थांबा रद्द का करण्यात आला ? लोकप्रतिनिधी यांनी याचे उत्तर जनतेला द्यावे अन्यथा या कुचंबनेची जनता परतफेड केल्याशिवाय राहणार नाही घाटनांदूरच्या रेल्वेप्रश्नासाठी खासदार प्रितम मुंडे यांच्या अश्वासनावर विश्वास ठेवून गेली दहा वर्षे त्यांचे उंबरे झिजवले परंतु यांनी घाटनांदूरकरांना दिलेला शब्द पाळला नाही; यावरून घाटनांदूरकरांना मतदानापुरतं गृहीत धरलं जातं. त्यामुळे आम्ही तरुणांनी मिळून मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. आशिष पिंपळे लाखोंची उलाढाल होणारे रेल्वेस्थानक पडले ओसाड पूर्वीची पॅसेंजर पण सध्या जलदगतीत रूपांतरित झालेल्या औरंगाबाद- हैद्राबाद तसेच नांदेड बँगलोर जलदगती गाडीचा थांबा रद्द झाल्याने महिन्या अखेर लाख्खो रुपयांचे उत्पन्न देणारे घाटनांदूर रेल्वेस्थानकाचे वैभव लयास जाऊन ते निर्मनुष्य झाल्याचे भयंकर चित्र निर्माण झाले आहे; खा. प्रितम मुंडे यांनी मात्र जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न दुर्लक्ष करत असल्याचे घाटनांदूरकरांना प्रकर्षाने जाणवत आहे. गेल्या दाहवर्षांपासून सामान्य घाटनांदूर करांचा एक प्रश्न सुद्धा खासदार म्हणून सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत याची किंमत मुंडे कुटुंबाला मोजावी लागणार हे मात्र निश्चित आहे.

## सिरसदेवी परिसरात महसूल विभागाच्या डोळ्यासमोर बिन्दास्त अवैध वाळू वाहतूक हायवाने सुरु

## सिरसदेवीचे तलाठी व मंडळाधिकारी यांची बघ्याची भूमिका

**वादळवार्ता/गेवराई**

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरात अवैध वाळू वाहतूक हायवाने सुरु असून याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. महसूल प्रशासनाच्या डोळ्यासमोर बिन्दास्त वाळूची चोरट्या मार्गाने खुलेआम वाहतूक सुरु आहे. वाळू माफियावर कारवाई करण्यास व वाळूचोरी रोखण्यात सिरसदेवीचे तलाठी व मंडळ अधिकारी आणि महसूल प्रशासन अपयशी ठरले असून मा.जिल्हाधिकारीबीडयांनीलक्षघालून वाळू माफियावर कारवाई करावी. सिरसदेवी गावातून तलवाडा रोडणी सुसाट वेगाने येणारा वाळूने गच भरलेला हायवा दिवसा ढवळ्या अवैध वाळू वाहतूक करत असून याकडे महसूल कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तसेच सिरसदेवी गावातून दररोज दोन ते तीन हायवामधून बिन्दास्तपणे वाळूची चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात असून या वाळू चोरीमुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. दररोज दोन ते तीन हायवा मधून अवैध वाळू वाहतूक केली जात असताना स्थानिक महसूल प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करून वाळू माफियाना अभय देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. तसेच वाळू वाहतूक करणारे हायवा रस्त्यावरून सुसाट वेगाने जात असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची भीती आहे. या वाळू माफिया विरुद्ध तक्रार करणाऱ्यास धमकी देण्याचा प्रकार देखील वाढला आहे. आमच्या विरुद्ध कोणाकडेही तक्रार करा, अधिकाऱ्याचे नंबर आहेत का आम्ही देऊ, आमच्यावर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही, असे वाळू माफिया आत्मविश्वासाने सांगत आहेत. तसेच सिरसदेवी परिसरात अनेक नवीन बांधकामे सुरु असून वाळू माफियाकडून ठिकठिकाणी वाळूचे साठे करण्यात आले आहेत. तसेच वाळूची टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री करून ग्राहकांची लूट केली जात आहे. वाळू माफियाचे दलाल दिवसभर महसूल कार्यालय परिसरात तसेच सिरसदेवी परिसरात फिरत असल्यामुळे नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे. रात्री दहा वाजण्याच्या नंतर पासून ते सकाळी आठ पर्यंत वाळूची वाहतूक बिन्दास्त सुरु आहे. वाळू चोरीस आळा घालण्यात अथवा कारवाई करण्यास स्थानिक महसूल प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले असून मा. जिल्हा अधिकाऱ्यांनी स्वतः सिरसदेवी परिसरात लक्ष घालून वाळू माफियाच्या मुसक्या आवळाव्यात अशी मागणी परिसरातील ग्रामस्थमधून होत आहे.

## महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंप निश्चित? देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

**दैनिक वादळ वार्ता मुंबई**

ठाकरे गटाकडून आज लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत 17 जागांचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. पण यापैकी सांगली आणि उत्तर पश्चिम मुंबई या दोन जागांवर जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांवर काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. या दोन्ही जागांवर काँग्रेसचा दावा होता. विशेष म्हणजे सांगलीच्या जागेसाठी काँग्रेस आमदार विश्वजीत कदम हे दिल्ली पक्षश्रेष्ठींच्या भेटीसाठी गेले आहेत. सांगली लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. त्यामुळे ही जागा काँग्रेसकडेच राहावी, अशी विनंती विश्वजीत कदम यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे. ठाकरे गटाकडून सांगली लोकसभा मतदारसंघासाठी डबल महाराष्ट्र केसरी विजेते चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघासाठी अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी जाहीर झालीय. या जागेवरुन काँग्रेस नेते संजय निरुपम यांनी आक्षेप घेत ते आक्रमक झाले आहेत. तसेच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पक्षाचे उमेदवार जाहीर केले आहेत. त्यांनी महाविकास आघाडीसोबत न जाता एकला चलोचा नारा दिला आहे.

# लोकसभा निवडणूक साठी नायगाव येथे १९१६ अधिकारी कर्मचारी २९ मार्च घेणार रोजी प्रशिक्षण-स्वाती दाभाडे

**वादळवार्ता/नायगाव**

१६ नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकी करीता ८९ नायगाव विधानसभा मतदार संघातील मतदान अधिकारी, कर्मचारी झोनल,मास्टर ट्रेनर यांचे प्रथम प्रशिक्षण कुसूमलॉन्स मंगल कार्यालय, नांदेड रोड, नायगाव (खै) येथे २९ मार्च रोजी दोन टप्यात आयोजित करण्यात आले असून. या प्रशिक्षणात १९१६ अधिकारी कर्मचारी घेणार आहेत.अशी माहिती सहायक निवडणूक अधिकारी स्वाती दाभाडे मॅडम यांनी दिली.

सदर प्रशिक्षण सकाळ (सकाळी ९ ते दुपारी ११वाजे पर्यंत) व दुपार (दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजे पर्यंत) असे दोन सत्रात होणार आहे. एका सत्रात एकाच वेळी पीपीटी द्वारे प्रशिक्षण व स्वतंत्र क्लास रूम मध्ये ईव्हीएम व व्हीव्हीपैट चे हँडस आन (प्रात्यक्षिक) प्रशिक्षण देणार येणार आहेत पहील्या सत्रात मतदान केन्द्राध्यक्ष सहायक मतदान केन्द्राध्यक्ष असे एकूण ८६९ अधिका-यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सकाळ सत्रात पहीले दोन तास (सकाळी ९ ते ११ वाजे पर्यंत) ४५० अधिका-यांना पीपीटी सादरीकरण द्वारे निवडणूक कार्यप्रणाली व मतदान केन्द्रावरील कर्तव्य, विविध फॉर्म याबद्दल माहिती देण्यात येणार तर याच सत्रात (सकाळी ९ ते ११ वाजे पर्यंत) स्वतंत्र क्लासरूम मध्ये उर्वरित ४१९ अधिकारी यांना दोन तासात ईव्हीएम /व्ही व्ही पॅट चे क्लास रूम हँडस (प्रात्यक्षिक) प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सकाळच्या सत्रातच पुढील सकाळी ते दुपारी या वेळेत वरील ४१९ अधिकारी यांना पीपीटी द्वारे प्रशिक्षण देण्यात येईल तर वरील ४५० अधिकारी यांना स्वतंत्र क्लास रूम ईव्हीएम /व्हीव्ही पॅट चे क्लास रूम हँडस (प्रात्यक्षिक) प्रशिक्षण देण्यात येणार आहे

तसेच दुपारच्या सत्रात (दुपारी २ ते ६ वाजेपर्यंत) मतदान अधिकारी २ (PO२) व मतदान अधिकारी ३ (PO३) असे एकूण ८५२ अधिकारी प्रशिक्षण घेणार आहेत. दुपार च्या



सत्रात पहीले दोन तास (दुपारी २ ते ४ वाजे पर्यंत) ४५० अधिका-यांना पीपीटी प्रजेटेशन द्वारे निवडणूक कार्यप्रणाली व मतदान केन्द्रावरील कर्तव्य, विविध फॉर्म याबद्दल माहिती देण्यात येणार तर याच सत्रात (दुपारी २ ते ४ वाजे पर्यंत) स्वतंत्र क्लासरूम मध्ये उर्वरित ४०० अधिकारी यांना दोन तासात ईव्हीएम व्हव्हीपॅट चे क्लास रूम हँडस (प्रात्यक्षिक) प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

दुपारच्या सत्रातच पुढील दोन तासात दुपारी ०४ ते सांयकाळी ६ या वेळेत वरील ४०० अधिकारी यांना पीपीटी द्वारे प्रशिक्षण देण्यात येईल तर उर्वरीत ४५२ अधिकारी यांना स्वतंत्र क्लास रूम मध्ये ईव्हीएम व्ही व्ही पॅट चे क्लास रूम हँडस ऑन (प्रात्यक्षिक) प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ट्रेनिंग देण्यासाठी ४२ झोनल अधिकारी व १० मास्टर ट्रेनर नेमण्यात आले आहेत.

या प्रशिक्षणासाठीनायगाव उमरी धर्माबाद या तीनही तहसील कार्यालयातील तलाठी, म.अ. सर्व निवडणूक अनुषंगीक कर्मचारी कर्मचारी उपस्थित असणार आहेत. निवडणूक कर्तव्यावरील कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी दि. २९/०३/२०२४ रोजी प्रशिक्षणासाठी आल्यानंतर प्रपत्र १२ व १२- अ भरुन जमा करावे जेणेकरुन त्यांना टपाली इडिसी मतपत्रिका उपलब्ध करुन देता येईल व त्यांना निवडणुक कर्तव्यावर असताना देखील त्यांचा मतदानाचा हक्क बजावता येईल असे आवाहन श्रीमती स्वाती दाभाडे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ८९ नायगाव विधानसभा मतदारसंघ यांनी पत्रका द्वारे केले आहे.

## आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी डिजिटल व्यवहाराकडे वळणे अत्यावश्यक - प्रा. अभय येवतेकर

**माजलगाव/ प्रतिनिधी**

आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी डिजिटल व्यवहाराकडे वळणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. अभय येवतेकर यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात मॉडर्न बँकींग इन इंडिया या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. महेश देशमुख तसेच विभागातील प्रा.मंदा मस्के उपस्थित होत्या.

पुढे बोलताना प्रा. अभय येवतेकर म्हणाले की, भारतातील बँकांचा इतिहास हा फार मोठा आहे. परंतु आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण भारतीय लोकांना डिजिटल व्यवहारासाठी प्रवृत्त केले आहे. या माध्यमातून आपल्या देशामध्ये सध्या खूप मोठ्या प्रमाणात डिजिटल व्यवहार होत आहेत. ग्रामीण भागातील लोक सुद्धा गुगल पे, फोन पे व इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग,ए.टी.एम. या साधनांचा वापर करून पैसे एकमेकास पाठवत आहेत. हे खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. नंतर त्यांनी सद्य परिस्थितीत बँक व्यवहार करण्याच्या पध्दतीतील बदलाविषयी माहिती दिली. त्यामुळे कोणत्याही वेळी आपण आधुनिक बँकींगचा वापर करून आर्थिक व्यवहार पूर्ण करू शकतो. वरील आधुनिक साधने कशी वापरावीत या संदर्भात या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले.

अध्यक्षीय समारोप करताना अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. महेश देशमुख म्हणाले की,ग्रामीण भागात आजही पारंपरिक बँकींग पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. या ऐवजी आधुनिक बँकींग प्रणाली चा वापर केला गेला तर वेळ व पैसा यांची बचत होते असे ते म्हणाले. तसेच आधुनिक बकींगचे फायदे-तोटे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि.तुषार पट्टेकर यांनी केले तर आभार प्रा. मंदा मस्के यांनी मानले. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पाणी पट्टी थकल्याने मांजरा धरणावरून होणारा अंबाजोगाई शहराचा पाणी पुरवठा खंडित

## ५ कोटी १४ लाखाची पाणीपट्टी थकीत



**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई नगरपरिषदेकडे पाणी पुरवठा योजनेची ५ कोटी १४ लाख रुपयांची पाणी पट्टी थकल्याने मंगळवारी मांजरा धरणावरून शहराचा पाणी पुरवठा खंडित करण्यात आला आहे. पाणी पट्टी भरण्यासंदर्भात सूचना देऊन ही त्याकडे दुर्लक्ष केल्याने लातूरच्या पाटबंधारे विभाग क्र. १ च्या कार्यकारी अभियंत्यांनी पाणी पुरवठा बंद करण्याचे आदेश दिले. ऐन उन्हाळ्यात पाणी पुरवठा बंद झाल्याने अंबाजोगाईकरांना टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे.

केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरणातुन अंबाजोगाई शहरला पाणी पुरवठा योजनेसाठी वर्षासाठी १३.३८ दलघमी पाणी आरक्षित आहे. नगरपरिषदेने पाणी पट्टी पोटी सन २०२३-२४ या वर्षात केवळ ५ लाख ७० हजार ४५६ रुपयांचा भरणा केला आहे. त्यामुळे या योजनेकडे ५ कोटी १४ लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत आहे. सदर या आर्थिक वर्षामध्ये प्राधिकरण कार्यालयाकडुन बिगर सिंचन पाणी पट्टी वसुलीचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात येत असल्याने थकीत असलेली पाणी पट्टी रक्कम १५ मार्च पर्यंत भरणा करण्यात यावी. अन्यथा महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील भाग - ६ प्रकरण १ कलम ४९ (ज) अन्वये पाणी पुरवठा खंडीत करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल. असा इशारा नोटीसद्वारे लातूरच्या पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता पाटील यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दि.७ मार्च रोजी दिला होता. मात्र मुख्याधिकाऱ्यांनी याची दखल न घेता या नोटिसकडे दुर्लक्ष केल्याने शेवटी कार्यकारी अभियंत्यांनी पाणी पुरवठा खंडित करण्याचे आदेश दिले. त्यांच्या आदेशानुसार धनेगावच्या पाटबंधारे सिंचन शाखा क्र. १ चे शाखाधिकारी सुरज निकम यांनी मांजरा धरणावरून अंबाजोगाई शहर पाणी पुरवठा योजनेचा पाणी पुरवठा खंडित केला आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या दिवसात अंबाजोगाई शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची आणि टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
वादळ वार्ता

## बीड जिल्हाध्यक्ष पदी पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांची निवड



वादळवार्ता/केज राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव , राज्यसचिव निलेश ठाकरे यांच्या आदेशानुसार दैनिक प्रभास केसरी चे कार्यकारी संपादक तथा स्टार 24 न्यूज चॅनेलचे संपादक दत्तात्रय मुजमुले यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या "बीड जिल्हा अध्यक्ष " पदी निवड करण्यात आली आहे.

पुरोगामी पत्रकार संघात आजवर विविध पदावर केलेल्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, पत्रकार बांधव यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येते आहे.

# मंगळवेढा बसस्थानक व आगारात शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींचे स्वच्छता अभियान

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

महाविद्यालयीन जीवनात सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी शासकिय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, मंगळवेढा यांच्यावतीने दि.२७ मार्च २०२४ रोजी राज्य परिवहन मंगळवेढा बसस्थानक तसेच आगारात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर स्वच्छता मोहिमेत स्वयंसेवकांनी बसस्थानक परिसरातील पालापाचोळा, कचरा गोळा केला. सामाजिक बांधीलकी जोपासत ही स्वच्छता मोहिम राबविल्याचे संस्थेचे प्राचार्य डी.वाय.ओंबासे यांनी सांगितले.

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंगळवेढा यांनी यापूर्वीही मंगळवेढा आगार व बसस्थानकावर स्वच्छता मोहिम राबविली आहे. शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंगळवेढा यांचा नेहमीच सामाजिक कार्यामध्ये पुढाकार घेऊन काम करित असते. आजही संस्थेच्या प्रशिक्षणार्थींनी आगार व बसस्थानकावर वाळला पालापाचोळा, कचरा, प्लास्टिक बाटल्या, उचकटलेले दगडगोटे गोळा करुन संपूर्ण परिसराची साफसफाई केली. सदर मोहिमेत संस्थेचे प्राचार्य श्री.ओंबासे सर, एस.एस.गोडसे , खमितकर मॅडम, पी.डी.खामकर सर, पी.आर. गायकवाड सर, डी.आर.देठे सर, व्ही.व्ही.ताठे सर, एम.व्ही. केंगार सर, टी.एस.इंगळे सर, के.ए.ताड सर, जाधव सर, गवळी सर व घुनावत सर आदी प्रशिक्षक उपस्थित होते. तसेच रा.प.मंगळवेढा आगाराचे आगार व्यवस्थापक श्री.संजय भोसले, स्थानक प्रमुख श्री.शरद वाघमारे, वाहतूक निरिक्षक श्री. योगेश गवळी ,लेखाकार श्री. योगेश कांबळे, वरिष्ठ लिपिक अमोल काळे, धनाजी पाटील, गणेश गवळी व सचिन माने आदी कर्मचारी उपस्थित होते.



## बाबुराव पोटभरेंचा शाक्य बंगलाफबीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू!

**माजलगाव प्रतिनिधी दि.27**

लोकसभा निवडणुक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने माजलगाव येथील बाबुराव पोटभरे यांचा शाक्य बंगला बीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू ठरताना दिसत आहे. महाविकास आघाडीचे संभाव्य उमेदवार म्हणून चर्चित असलेले बजरंग सोनवणे यांच्या नंतर आज शिवसंग्राम संघटनेचे स्व. विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनीही बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य बांगल्यावर भेट दिली. आक्रमक,सडेतोड वक्तृत्व शैली, निडर आणि प्रभावशील नेतृत्व म्हणून बीड जिल्ह्यात बाबुराव पोटभरे यांची ठळक ओळख आहे. गेल्या कित्येक वर्षापासून चळवळीत काम करणाऱ्या या नेत्याची जिल्ह्यासह मराठवाड्यातल्या तरुणात क्रेझ आहे. प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या सभांना हजारोंची गर्दी उसळून येते. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत माजलगाव येथील बाबुराव पोटभरे यांच्या शाक्य बंगल्याला विशेष महत्त्व आले आहे.



लोकसभेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असणारा प्रत्येक उमेदवार शाक्य बंगल्यावर हजेरी लावत आहेत. निवडणुकीत विजय पदरात पाडून घेण्याचं हक्काचं ठिकाण म्हणून पोटभरे यांचा शाक्य बंगला आज घडीला बीडच्या सत्ता समीकरणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.बजरंग सोनवणे यांच्या भेटीनंतर बुधवार दि.27 रोजी संध्याकाळी ज्योतीताई मेटे यांनीही शाक्यबांगल्यावर बाबुराव पोटभरे यांची भेट घेतली.या भेटीतून कोणते राजकीय समीकरणे जुळऊन येतील याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून आहे.

## डॉ प्रियंका राजेभोसले सिंगापूर येथे लोकमत इंटरनॅशनल ग्लोबल वूमन्स अवॉर्ड नी होणार सन्मानित.

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगाव ( प्रतिनिधी) तालुक्यातील गुरुकृपा सेवाभावी संस्थेने वैद्यकीय क्षेत्रात कमी कालावधीत मोठी भरारी घेतली आहे.कोविड काळातील काम देखील कौतुकास्पद गेले केलें आहे.या संस्थेच्या सामाजिक वैद्यकिय कामाची दखल घेऊन गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या सचिव डॉ. प्रियंका यशवंत राजेभोसले यांना ' लोकमत इंटरनॅशनल ग्लोबल वूमन्स अवॉर्ड 'मिळाला आहे. हा पुरस्कार सोहळा सिंगापूर येथे 28 व 29 मार्च रोजी देण्यात येणार आहे. पुरस्कार सोहळ्यास जाण्यापूर्वी त्यांचा सत्कार विविध क्षेत्रातील मान्यवरांन कडून करण्यात येत आहे.लोकमत माजलगाव प्रतिनिधी पुरुषोत्तम करवा व दैनिक सकाळ चे प्रतिनिधी



पांडुरंग उगले यांनी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी सत्कार स्वीकारून संस्थेचे अध्यक्ष यशवंत राजेभोसले व डॉ प्रियंका राजेभोसले यांनी आभार व्यक्त केले.

## मेंढ्यांना पिण्याच्या पाण्याची तहान भागविणारा जरंडीतील अवलिया

**वादळवार्ता/सोयगाव**

उन्हाळी हंगामातील मका पिकांना बाजुला सारून मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी शेतातील पाणपोई चा भन्नाट उपक्रम सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील शेतकऱ्याचा शेतातील पाणपोई चा उपक्रम तालुका भर चर्चेचा ठरला आहे ;सोयगाव सह परिसरात पाण्याचे दुर्भिक्ष आणि उन्हाची तीव्रता वाढल्या मुळे जनावरांच्या घशाची कोरड वाढली आहे सोयगाव परिसरात नाशिक जिल्ह्यातून मेंढपाळांचे कळप दाखल झाले आहे परंतु शेती शिवारात मेंढ्यांना पिण्याच्या पाण्याचा थेंबही मिळतं नसल्याने जरंडी शिवारातील शेतकऱ्यांने चक्क शेतात मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी तात्पुरते शेत तळे उभारून मेंढ्या, शेळ्या व जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली




आहे त्यामुळे जरंडी शिवारात जनावरांना पिण्याच्या पाण्याची पानपोयी उभारली आहे

विजय गोविंदा चौधरी या जरंडी शिवारात शेती असलेल्या शेतकऱ्याने हा प्रयोग हाती घेतला आहे रस्त्याच्यालगत शेती असल्याने सोयगाव कडून बनोटी कडे जाणाऱ्या मेंढ्याचे कळप जंगलात चरण्यासाठी जाणारी जनावरे,शेळ्या आदींसह निंबायती जरंडी च्या जंगलातील वन्यप्राण्यांची ही या शेततळे वर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या शेतकऱ्याने केली आहे स्वखर्चाने विजय चौधरी यांनी हे शेततळे उभारून मुक्या जनावरांच्या घशाची कोरड दूर करण्यासाठी हा नवीन शेतीतील पाणपोई उपक्रम राबविला आहे विहिरीतील तुटपुंजे उपलब्ध पाणी उन्हाळी पिकांना न वापरता मुक्या प्राण्यांच्या तहान भागविण्यासाठी हे विहिरीतील पाणी ते शेततळ्यात सोडून जनावरांची तहान भागवीत आहे दरम्यान विजय चौधरी यांनी चार एकर क्षेत्रावर उन्हाळी मका लागवड केली आहे परंतु त्यांनी विहिरीत उपलब्ध असलेले पाणी मका पिकांना देण्या ऐवजी जनावरांच्या तहान भागविण्यासाठी राखीव केले आहे त्यामुळे त्यांनी उन्हाळी मका पिकांना पाण्याची ताडन दिली आहे उभे पीक वाळवून त्यांनी जंगलातील वन्यप्राण्यासह पाळीव जनावरांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे...

# वंचितचे प्रकाश आंबेडकरांची मनोज जरांगे यांच्या सोबत नवी आघाडी ?

### अशी आहे वंचितची पहिली यादी

अकोला : प्रकाश आंबेडकर, भंडारा-गोंदिया : संजय केवट ,गडचिरोली : हितेश पांडूरंग मडावी चंद्रपूर : राजेश बेले ,बुलडाणा : वसंतराव मगर ,अमरावती : प्राजक्ता पिल्लेवान ,वर्धा : प्रा. राजेंद्र साळुंके,यवतमाळ-वाशिम : खेमसिंग पवार

**वादळवार्ता/अंतरवाली सराटी**

अकोल्यातून प्रकाश आंबेडकर यांना उमेदवारी राज्याच्या राजकारणात नवा ट्विस्ट आला आहे. कारण वंचित आघाडीचे नेते प्रकाश आंबडेकर यांनी थेट मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्यासोबत नवी आघाडी केली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी नुकतीच मनोज जरांगे यांची भेट घेतली. या भेटीनंतर प्रकाश आंबेडकर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन, नव्या आघाडीची घोषणा केली. दुसरीकडे प्रकाश आंबडेरांनी जरांगेंसोबत आघाडी केल्याने ते महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यावर शिक्कामोर्तब झालं आहे.



प्रकाश आंबेडकर काय म्हणाले?

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर बोलताना म्हणाले की, "काल राज्य कार्यकारिणीची बैठक झाली त्यात काही निर्णय झालेत. काल रात्री मी मनोज जरांगे पाटील यांना भेटलो.विस्ताराने बोलणे झाले. त्यात ओबीसीसोबत आघाडीचा निर्णय घेतला गेला. मुस्लिम, जैन समाजाला उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. जास्तीत जास्त उमेदवार गरीब वर्गातील असतील.पहिल्या टप्प्यातील उमेदवारांना जरांगेंचं समर्थन असेल. ते त्यांची अंतिम भूमिका ३० तारखेला घेतील. जरांगेंनी ३० तारखेपर्यंत थांबायची



विनंती केली. त्यांची विनंती मान्य केली. जरांगे आणि दोघे मिळून लढणार ? कि आणखी ३० तारखेला कांही वेगळी भूमिका असणार याकडे महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लाकले आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )